ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे योगदान"

प्रा. डॉ. व्हनबिंदगे व्ही. पी.
छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, सोलापूर.

## प्रास्ताविक :-



भारतीय प्रजासत्ताकाच्या हिरक महोत्सवी वर्षातच महाराष्ट्र या मराठी भाषिकांच्या स्वतंत्र राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा होणे हा खरे तर योगायोगच! १ मे १९६० हा महाराष्ट्र राज्याचा स्थापनेचा दिवस या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना राज्याच्या या सुवर्ण महोत्सवी वाटचालीतील असे अनेक क्षण आणि घटना आठवतात. ज्याच्या प्रभावाच्या खुणा या मातीवर उमटल्य्ज्ञ या मातीतल्या माणसाच्या ह्दयात कोरल्या गेल्या, अनेक गोष्टी अशा होत्या की, ज्याच्या मराठी माणसाला कायम अभिमान वाटत आला. महाराष्ट्राच्या विकासाचा रथ त्यांनी आपल्या खांद्यावर वाहून नेला. पण भारताला स्वातंत्र्य मिळाले. नंतरच्या तीनच वर्षात देशाची घटना तयार झाली आणि प्रजासत्ताक भारतात १९५० च्या दशकात भाषावर प्रांतरचनेची मागणी जोर धरु लागली. या मागणीसाठी उग्र आंदोलनही सुरु झाली आणि त्याची परिणीती तेलगू भाषिकांना त्यांचे स्वतंत्र आंध्र राज्य मिळविण्यात झाली. पण मराठी भाषिकांची मागणी मात्र सहजासहजी मान्य करायला केंद्र सरकार तयार नव्हते कारण त्यात मुंबई हा कळीचा मुद्दा होता. हुतात्म्याचे बलिदान आणि या नेत्यांची मुत्सद्देगिरी पणास लागली आणि अखेर मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य १ मे, १९६० रोजी स्थापन झाले.

कोणत्याही देशाच्या किंवा राज्याच्या इतिहासात वयाची साठी गाठणे किंवा पन्नाशी ओलांडणे हे टप्पे अर्थातच फार महत्त्वाचे नाहीत पण भूतकाळाचा समृध्द वारसा पाठीशी ठेवून वर्तमानाचे भान राखत भविष्याचे तात्यासाहेब कोरे, बाळासाहेब विखे पाटील अशा धुरिणांनी सहकारी चळवळ रुजविण्यासाठी जोराने प्रयत्न केले. आर्थिक मंदीच्या काळातही या संस्था टिकून राहाव्यात, संस्थांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे. दुर्बल घटकांना अधिकाअधिक सहाय्य करावे. आपल्या कामाचे विविधीकरण करावे यासाठी सहकारी संस्थांनी प्रयत्नपूर्वक पावले उचलली आहेत. सहकाराबाबत राज्य सरकारने प्रथमपासून उदारधोरण स्विकारले. देशातील वित्तीय संस्थांनीही सहकारी संस्थांना वित्तसहाय्य करुन त्यांच्या विकासास हातभार लावला. सन २००४ साली सहकारी चळवळीची आजवरची वाटचाल व या पुढच्या काळातील आव्हाने याचा आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारने २००५ मध्ये उच्चस्तरीय समिती नेमली आहे. श्री शिवाजीराव गिरीधरराव पाटील या समितीचे अध्यक्ष आहेत.

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विस्तार :-

कृषि पतपुरवठा, शेती, आदिवासी विकास, बहुउद्देशीय पतपुरवठा साठवणी सुत गिरण्या, कापसाच्या गाठी बांधणे, तेल गाळणे, साखर उद्योग, गुळ उत्पादन, हातमाग, औद्योगिक प्रक्रिया, मत्स्य व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व वराहपालन, रेशीम उद्योग, घरबांधणी, नागरी बँका, वाहतूक सेवा, विणकाम, चर्मोद्योग, हॉटेल अशा अनेक क्षेत्रामध्ये सहकारी संस्था पोहोचल्या आहेत. देशातील एकूण सहकारी संस्थांपैकी २७.३% संस्था, १४.६८% सदस्य संख्या, २६.३% भागभांडवल व २६.९ खेळते भांडवल आहे. राज्यातील एकूण रोजगारात सहकारी क्षेत्राचा वाटा १२.५% आहे. महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटींग फेडरेशन ही सहकारी घर बांधणी संस्थामार्फत ३२ लक्ष घरांची बांधणी पूर्ण होत आहे. विदर्भ

विणकर सहकारी संस्थांच्या दुकानाचे जाळे महाराष्ट्रभर पसरलेली आहे. देशातील ४० महिला सहकारी बँका आहेत. त्यापैकी २२ सहकारी कल्वर को-ऑपरेटिव्ह मार्केटींग फेडरेशन नॅशनल फेडरेशन को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज इत्यादी.

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती**

| अ.नं. | बाब | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २००८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सहकारी संस्था | ३१५६५ | ४२६०३ | ६०७४७ | १०४६२० | १५८०१६ | २०५७५३ |
| २. | सभासद संख्या (लाखात) | ४२ | ८६ | १४८ | २७० | ४३० | ४८४ |
| ३. | वसुल भाग भांडवल (रु. कोटीमध्ये) | ५३ | २३६ | ६०० | १९७५ | ७५६० | १२८२३ |
| ४ | खेळते भांडवल (रु. कोटीमध्ये) | ३२६ | १४९० | ५२१० | २४७१३ | १३४४४१ | २१०५३० |

वरील तक्त्यावरुन राज्यातील सहकारी चळवळीची प्रगती स्पष्ट होते. सहकारी संस्थांची संख्या, सभासद संख्या, खेळते भांडवल व वसुल भांडवल अशा बाबतीत प्रगती जलद आहे. वरील पैकी ६३% सहकारी संस्था थोड्याफार नफा कमावणाऱ्या होत्या. एकुण सहकारी संस्थांपैकी २६% इतके मोठे प्रमाण तोट्यात असणाऱ्या संस्थांचे होते तर उरलेल्या ना नफा ना तोटा अशा स्थितीत होत्या. सर्व सहकारी संस्थांच्या वसुली भांडवलापैकी सुमारे १५% शासनाचे भागभांडवल आहेत.

सहकारी संस्थामध्ये त्रिस्तरावर काम करणाऱ्या कृषि पतसंस्था आहेत. खेडेगावामध्ये प्राथमिक सहकारी संस्था, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती बँका व राज्यस्तरावर राज्य सहकारी बँक (शिखर बँक) अशी सहकारी पतयंत्रणा आहे. पुढील कोष्टकात महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांची प्रगती दाखविली आहे.

**महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांची प्रगती**

| अ.नं. | बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | २००७-०८ |
|---|---|---|---|---|
| १. | सहकारी संस्था (शिखर व मध्यवर्ती) | ३९ | २९ | ३५ |
| २. | प्राथमिक शेतकरी सहकारी संस्था | २१४०० | २०४२६ | २१२८८ |
| ३. | सभासद संख्या (हजारात) (शिखर व मध्यवर्ती संस्था) | ८६ | ७० | २०७ |
| ४. | सभासद संख्या (हजारात) (प्राथमिक सहकारी संस्था) | २१७० | ३७९४ | १२४३८ |
| ५. | खेळते भांडवल (कोटी रु.) | | | |
| | अ. शिखर व मध्यवर्ती संस्था | ११९ | ६१३ | ७०१३४ |
| | ब. प्राथमिक शेतकरी सह. संस्था | ५८ | ३४३ | ११८६३ |
| ६. | दिलेली कर्जे (कोटी रु.) | | | |
| | अ. शिखर व मध्यवर्ती संस्था | १७५ | ७५१ | २९४७० |
| | ब. प्राथमिक शेतकरी सह. संस्था | ४३ | १३३ | ५८२८ |

वरील तक्त्यात सहकारी संस्थांची संख्या थोडी घटलेली दिसली तरी ही संख्या दुर्बल व कमकुवत संस्था बंद पडल्याने किंवा त्याचे विलिनीकरण घडून आल्याने कमी झाली आहेत. राज्य सहकारी बँकेने १९७९-८० या वर्षी ५१.३२ कोटी रुपये तर २०००-०१ मध्ये सुमारे ९.५ कोटीचे दिर्घ मुदतीचे कर्ज वाटप केले होते. ६ वर्षापूर्वी राज्य सहकारी बँकेचे महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक असे नामांतर झाले. नावाबरोबर कार्यपध्दती व ध्येयधोरणे यातही बदल होऊन ग्रामीण विकासास आता अधिक गती मिळेल अशी अशा आहे. मात्र प्रचंड फुगलेला थकबाकी सरकारने कर्ज हमी देण्यास दिलेला नकार त्यामुळे नाबार्डने थांबवलेला कर्जपुरवठा यामुळे ही बँक आर्थिक संकटात आली आहे. नवीन कर्जपुरवठा थांबलेल्या सर्व व्यवहार अडचणीत आले आहेत.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकांच्या राज्यात एकूण ५० शाखा आहेत. या बँकेने सन २००८ मध्ये १०२२७ कोटी रुपयाचे कर्ज वाटप केले होते.

दहाव्या पंचवार्षिक योजनेत (२००२-०७) सहकार क्षेत्राच्या विकासासाठी ४५६.१४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. एकूण योजना खर्चाशी हे प्रमाण सुमारे ४ टक्के आहे.

## सारांश :-

१ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. भारतीय प्रजासत्ताक हिरक महोत्सवी वर्षातच महाराष्ट्र या मराठी भाषिकांच्या स्वतंत्र राज्याच्या सुवर्ण महोत्सव साजरा होणे हा योगायोगच! महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विकास होत गेला. पण १९७० च्या दशकात महाराष्ट्रात सहकारी चळवळ फोफावली. ग्रामीण भागात यामुळे पैसा येऊ लागला. तंत्रज्ञान ग्रामीण भागात पोहोचले. सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा कायापालट होऊ लागला. साखर कारखान्यापाठोपाठ शिक्षण संस्था आणि पूरक उद्योगही ग्रामीण भागात निघाले. नंतरच्या काळात सहकारी चळवळीचे राजकीयीकरण झाल्यानंतर त्या चळवळीत घरघर लागली. मात्र या चळवळीने ग्रामीण भागाला वरदान दिले होते.  ही वस्तुस्थिती आहे.

एकंदरीत महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासास सहकारी चळवळीने मोठा हातभार लावला आहे. महाराष्ट्राचे भूषण म्हणूनच सहकारी चळवळीकडे पाहण्यात येते. सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, दूध उत्पादक संस्था, कुक्कुटपालन संस्था, पतपुरवठा संस्था, सेवा सहकारी संस्था इत्यादी संस्थांच्या उभारणीमुळे महाराष्ट्राला आर्थिक व सामाजिक विकासाचा महामंत्र दिला. महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाचे आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात सहकारी चळवळीचा सिंहाचा वाटा आहे. नागरी भागातदेखील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे विविध उद्योग व व्यवसायाचा विकास झाला.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीबाबत अनेक दोष असले तरी सहकाराच्या माध्यमातूनच राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाची समिकरणे मांडता येऊ शकतात. सहकारी चळवळीतील असणारे दोष दूर करण्यासाठी काही प्रभावी उपाययोजना करता येऊ शकतात. सहकारी चळवळीच्या यशासाठी प्रामाणिकपणे आणि निस्वार्थीपणे काम करणारे कार्यकर्ते पाहिजे. सहकारी चळवळीस सुजाण व व्यापक भूमिका असणारे नेतृत्त्व लाभले पाहिजे. सहकारी चळवळ ही केवळ कृषि क्षेत्रापुरतीच मर्यादित नाही तर सहकारी चळवळ ही केवळ कृषि क्षेत्रापुरतीच मर्यादित नाही तर सहकारी चळवळ ही समाज, शिक्षण व सांस्कृतिक परिवर्तनासाठी आहे. मध्यस्थांच्या वर्गाकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी सहकाराशिवाय दुसरा पर्याय नाही. शेतमालास वाजवी किंमत मिळवून देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा फुलोरा फुलविण्यासाठी सहकार हा उत्तम मार्ग आहे. ग्राहकांना वाजवी दरात चांगल्या दर्जाच्या वस्तू सहकाराच्या माध्यमातून मिळू शकतात. समाजातील अनेक घटकांचे शोषण थांबविण्यासाठी सहकारी चळवळीचा विकास होणे गरजेचे आहे. सहकाराची पताका खांद्यावर घेऊन वाटचाल करणारे तळमळीचे वारकरी सहकारी चळवळीस मिळाले पाहिजेत.